
# शोध परमेश्वराचा


## In Search of God


मौलाना वहीदुद्दीन खान


मराठी अनुवाद : प्रा. सरताज एम. सिद्दीकी

# मौलाना वहीदुद्दीन खान यांच्या ऊर्दु पुस्तकांचे मराठी भाषांतर























मराठी पुस्तके खालील पत्त्यावर मिळतील.

**अब्दुस समद खलिल अहेमद**

**१०५०, रविवार पेठ, पुणे – ४११००२**

फोन नं. : 020-24472830 मोबा. नं.: 9665059035

# शोध परमेश्वराचा

## In Search of God

मौलाना वहीदुद्दीन खान

मराठी अनुवाद

प्राः सरताज एम. सिद्दीकी

## मनोगत

**माणूस सदैव राहणारी निर्मिती आहे. पण त्याचे जीवन दोन टप्प्यांत विभागलेले आहे.**

१) मृत्युपूर्वीचा जीवनकाळ आणि २) मृत्युनंतरचा जीवनकाळ. मृत्युपूर्वीचा जीवनकाळ तयारी करण्याचा काळ आहे, आणि मृत्युनंतरचा जीवनकाळ केलेल्या तयारीनुसार मोबदला मिळवण्याचा काळ ! प्रत्येक स्त्री–पुरुषाने सर्वप्रथम या वास्तविकतेला ओळखले पाहिजे, कारण याच आधारावर त्याचे चिरकालीन भविष्य अवलंबून आहे.

–प्रा. सरताज एम. सिद्दीकी

## मौलानांचा परिचय

मौलाना वहीदुद्दीन खानसाहेबांनी मानवी जीवनाचा उद्देश स्पष्ट करणारी, माणसाचा ईश्वराशी वास्तविक परिचय करून देणारी शेकडो पुस्तके लिहीली आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर असंख्य शांती पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले गेले आहे.

ईश्वर आणि त्याचा प्रेषित हेच खानसाहेब यांच्या लिखाणाचे स्रोत आहेत. ईश्वराच्या आदेशाशी विसंगत होईल असे विवेचन त्यांच्या लिखाणात सापडणार नाही. एखादी गोष्ट स्पष्ट करण्यासाठी काल्पनिक व कालबाह्य गोष्टी यांना त्यांच्या लिखाणात जागा नाही. खानसाहेब यांच्या लिखाणात वास्तविक व बुद्धीला पटणाऱ्या गोष्टी आहेत. म्हणून जीवनास योग्य दिशा मिळण्यासाठी खानसाहेब यांच्या लिखाणाचा अभ्यास कोणीही निश्चितपणे करू शकतो.

वहीदुद्दिन खानसाहेबांची पुस्तके उर्दू, हिंदी, इंग्रजी व इतर भाषांमध्ये उपलब्ध आहेत. इंटरनेटवरून सुद्धा ती मोफत डाउनलोड करता येईल. www.cpsglobal.org या वेबसाईटवर ती उपलब्ध आहेत.

•••

# प्रकरण १

## प्रत्यक्ष पुरावाः एका रहस्याचा

या जगात वास्तव्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ज्याची सर्वात जास्त खात्री आहे ते त्याचे किंवा तिचे स्वतःचे अस्तित्व आहे. असे असूनही, पूर्णपणे वैज्ञानिक भाषेत प्रत्येकजण एक रहस्य आहे. कारण मानवासाठी त्याचे शारीरिक अस्तित्व सर्वकाही नसते. तो ज्याला 'मी' म्हणतो त्यापासून त्याच्या अस्तित्वाची ओळख होत असते आणि ते 'मी' पाहण्यायोग्य नसते.

म्हणूनच जेव्हा रेने डेस्कार्टेस (१५९६-१६५०) या फ्रेंच तत्त्वज्ञानीला स्वतःच्या अस्तित्वाबद्दल पुरावा द्यायचा होता, तेव्हा त्याने असे म्हटले नाही, ''माझे निरीक्षण करण्यायोग्य शरीर आहे, म्हणून मी अस्तित्त्वात आहे.'' त्याऐवजी त्याचे म्हणणे होते, मी विचार करतो, म्हणून मी अस्तित्त्वात आहे. मानवाचे निश्चितपणे निरीक्षण करण्यायोग्य अस्तित्व आहे. माणूस अस्तित्वात आहे हे सर्वांना माहित आहे. पण, खरे तर माणसाचे अस्तित्व 'मी' च्या पातळीवर आहे आणि 'मी' ची अनुभूती आकलन किंवा जाणीव पातळीवर आहे, निरीक्षणाच्या स्तरावर नाही.

अगदी ईश्वराचे हेच आहे. जणू काही ईश्वर असीम 'मी' आहे. ईश्वराच्या या विराट 'मी' ची जाणीव संपूर्ण विश्वात पसरलेल्या त्याच्या निर्मितीतून होत असते. पण ईश्वराच्या अस्तित्वाचे प्रत्यक्ष निरीक्षण करता येत नाही. डेस्कार्टेस यांने स्वतःच्या अस्तित्वाबद्दल जो युक्तिवाद केला होता, त्याच तार्किक तत्वाच्या आधारे आपण ईश्वरावर विश्वास ठेवला पाहिजे, त्याचप्रमाणे ज्या आधारे पुरुष व स्त्रिया त्याच्यां स्वतःच्या अस्तित्वावर विश्वास ठेवतात.

मी ईश्वर समजू शकतो म्हणून ईश्वर अस्तित्त्वात आहे. सत्य हे

आहे की ईश्वर समजण्यायोग्य आहे हे त्याच्या अस्तित्वाचा निर्विवाद पुरावा आहे. जर आपण ईश्वराला नकार दिला तर आपण स्वत:लाच नाकारले पाहिजे. पण आपण स्वत:चे अस्तित्व नाकारू शकत नाही, म्हणून आपल्याला ईश्वराचे अस्तित्व नाकारणे शक्य नाही. स्वत:च्या अस्तित्त्वावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकजणाला तार्किकपणे असे म्हणणे भाग पडते की, ‘‘माझे अस्तित्व आहे, म्हणूनच ईश्वराचे अस्तित्व आहे.’’

# प्रकरण २

# ईश्वराचे अस्तित्व आहे का?

ईश्वराचे अस्तित्व आहे का? हा प्रश्न नेहमी आपल्या मनात निर्माण होतो. या प्रश्नाचे उत्तर तर्कसंगत पद्धतीने शोधण्याचा आपण प्रयत्न करू. या प्रश्नाला माझे उत्तर होकारार्थी आहे. माझे अध्ययन आणि माझ्या अनुभवावरून, मी पूर्णपणे दृढनिश्चयाने म्हणू शकतो की ईश्वर आहे. याबद्दल मुळीच संशयाला जागा नाही. जेव्हा मी म्हणतो, की ईश्वर आहे तेव्हा माझे म्हणणे प्रचलित नसून पूर्णपणे शास्त्रशुद्ध आहे.

लोक साधारणपणे मानतात की, काहीही सिद्ध करता येते, किंवा कुठल्याही गोष्टीचे खंडन करता येते. पण हा वैज्ञानिक दृष्टीकोन नाही. आधुनिक विज्ञानानुसार आपण कुठल्याही गोष्टीला सिद्ध किंवा खंडित करू शकत नाही. आपण केवळ निश्चिततेऐवजी संभाव्यतेजवळ पोहोचू शकतो. एखादी गोष्ट संभाव्यरित्या अस्तित्वात आहे, हे दर्शवण्यासाठी आवश्यक माहिती असेल तर आपण म्हणू शकतो की, ती गोष्ट अस्तित्वात आहे.

प्रस्तुत प्रश्न ''ईश्वर अस्तित्वात आहे किंवा नाही'', त्यातून आपोआप दुसरा प्रश्न उपस्थित होतो. मानववंशशास्त्राच्या अध्ययनाद्वारे हे सत्य स्थापित झाले आहे की, ईश्वराची संकल्पना मानवी स्वभावात घर करून आहे. ईश्वरावर श्रद्धा बाळगणे हे आपल्या स्वभावात भिनलेले आहे. प्रत्येक स्त्री आणि पुरुष जन्मजात श्रद्धा धारण करणारे आहेत. विशेषतः आणिबाणीच्या आणि असहाय्यतेच्या वेळी आपल्याला या गोष्टीची जाणीव होते की, एक सर्वशक्तिमान ईश्वर आहे. प्रत्येक स्त्री-पुरुषाने या स्वाभाविक घटनेचा आपल्या जीवनात किमान एकदा तरी अनुभव केला असणारच.

मग हा प्रश्न का निर्माण होतो की, ईश्वर अस्तित्वात आहे किंवा नाही. ईश्वराची संकल्पना आपल्या रक्तामांसात भिनलेली आहे. याचे कारण अतिशय साधे आहे. लोक हे जाणू इच्छितात की, त्याच्यां अंतर्भूत श्रद्धेला आणि भावनांना बौद्धिक आधार अथवा वैज्ञानिक पुरावा आहे किंवा नाही.

मी ठामपणे सांगेन की ईश्वराच्या अस्तित्वाच्या श्रद्धेला निश्चितपणे वैज्ञानिक आधार आहे. पण लोक साधारणपणे तो वैज्ञानिक पुरावा जाणून घेण्यात अपयशी ठरतात कारण ते चुकीच्या कसोटीला वैज्ञानिक पुरावा समजतात. त्याना निरीक्षणरूपी पुरावा हवा असतो, पण असा कुठलाही वैज्ञानिक पुरावा अथवा कसोटी असू शकत नाही, ज्याद्वारे आपण आपले मत बनवू शकतो. आपण योग्य कसोटी लागू केल्यास आपल्याला उमजेल, की ईश्वराचे अस्तित्व हे सिद्ध झालेले वास्तव (Proven Fact) आहे.

इथे मला १९६५ मध्ये घडलेली एक घटना आठवते, जेव्हा मी लखनौमध्ये राहत होतो. एकदा एका सद्‌गृहस्थाशी माझी भेट झाली त्यांची पीएचडी झाली होती आणि ते बर्ट्रान्ड रसेलचे मोठे प्रशंसक होते, अर्थातच ते नास्तिक होते. आमच्या ईश्वरासंबंधाने संभाषणादरम्यान त्यांनी प्रश्न केला 'ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी तुमच्याकडे कोणती कसोटी आहे?' मी उत्तर दिले, 'अगदी तीच कसोटी जी आपण कुठल्याही गोष्टीचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी वापरतो' आणि इथे आमचे संभाषण संपले.

हा विद्वान माणूस असा का स्तब्ध झाला. त्याचे कारण अतिशय साधे आणि सोपे आहे. माझ्या उत्तराने त्याना या वास्तविकतेची जाणीव करून दिली की आम्ही अशा जगात राहत आहोत, जिथे कुठल्याही संकल्पना सिद्ध करण्यासाठी आनुमानिक युक्तिवादाचा उपयोग केला जातो. त्याचद्वारे ईश्वराची सांकल्पनादेखील सिद्ध होते.

आपल्या आधुनिक काळात वैज्ञानिक ज्ञान अविश्वसनीय प्रमाणत वाढले आहे. परंतु, The Encyclopedia of Ignorance (अज्ञानाचा विश्वकोश) नुसार, ''ज्ञानाच्या प्रगतीने केवळ मानवाच्या अज्ञानातच भर घातली आहे.'' एका शास्त्रज्ञाने अगदी बरोबर सांगितले आहे, ''आम्हाला कमी महत्वाच्या गोष्टींबद्दल अधिकाधिक माहिती होत चालेली आहे. आता हे सिद्ध झाले आहे, की विज्ञान आपल्याला वास्तवाचे अंशिक ज्ञान देते.

मानवी ज्ञानाचे दोन भिन्न टप्पे आहेत. पहिला आईनस्टाईनपूर्व आणि दुसरा आईनस्टाईननंतरचा आईन्स्टाईनपूर्व भागात मानवी ज्ञान भौतिक विश्वापर्यंत मर्यादित होते. ते निरीक्षण आणि मोजमाप करण्याजोगे होते आणि म्हणून साधारणपणे असे गृहित धरले जात असे की प्रत्येक गोष्ट जिचे खरे अस्तित्व आहे, ती निरीक्षणायोग्य असली पाहिजे आणि जी गोष्ट निरीक्षणायोग्य नाही ती मुळात अस्तित्वातच नसते. याचा अर्थ असा की जे दृश्य विश्व आहे तेच खरे आहे. आणि जे अदृश्य आहे ते असत्य आणि काल्पनिक आहे.

या संकल्पनेने जो सिद्धांत निर्माण केला त्याला साधारणपणे तार्किक अस्तिभावदर्शीवाद (Logical Positivism) असे म्हणतात. याचा अर्थ असा होतो की तोच खरा तार्किक युक्तीवाद आहे. जे भौतिकरूपी प्रदर्शनीय आहे. याशिवाय इतर युक्तीवाद तार्किक युक्तिवाद नसून निराधार आहेत.

पण आईनस्टाईननंतरच्या काळात विसाव्या शतकाच्या प्रारंभी जेव्हा अणूचे विभाजन झाले तेव्हा परिस्थिती बदलून गेली. अणूच्या विभाजनानंतर भौतिकवादासंबंधीच्या सर्व कल्पना नाहीशा झाल्या आणि त्याची जागा अतिसूक्ष्म विश्वाने (Micro World) घेतली. अणूच्या विश्वापलीकडे जिथे प्रत्येक गोष्ट अदृश्य लहरीमध्ये रुपांतरित झाली जी मोजमाप योग्यही नाही, निरीक्षण योग्यही नाही. मानवी

ज्ञानात झालेल्या या क्रांतीनंतर तार्किक आणि बौद्धिक युक्तिवाद मोठ्या प्रमाणावर बदलेल. या बदललेल्या परिस्थितीने तत्त्ववेत्ते आणि शास्त्रज्ञांना तार्किक कसोटीत सुधारणा करण्यास भाग पाडले. आता अनुमानिक युक्तिवाद प्रत्येक युक्तिवादा एवढेच सत्य म्हणून मानले जाते. आधुनिक विज्ञानात अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो. जसे विद्युत-चुबिंकीय लहरी, गुरुत्वाकर्षण शक्ती, क्ष- किरण, इ. या सर्व गोष्टी स्वभावतः अभौतिक आहेत.

त्यांचे निरीक्षण केले जाऊ शकत नाही. तरीसुद्धा प्रत्येक वैज्ञानिक त्याच्या अस्तित्वामध्ये विश्वास ठेवतो. त्याचे साधे कारण असे की जर आपण या वस्तूंना प्रत्यक्षरित्या पाहू शकत नाही तरी त्यांचा प्रभाव आपण पाहू शकतो. उदा. गुरुत्वाकर्षण शक्तीचा अनुभव झाडावरून पडणाऱ्या सफरचंदाच्या स्वरूपात, क्ष-किरणांचा प्रभाव फोटोफिल्मच्या स्वरूपात. आपण या सर्व गोष्टींच्या अस्तित्वावर विश्वास ठेवतो. जरी आपण त्याचे निरीक्षण करू शकत नाही तरी आपण त्याचे प्रभाव अनुभवतो. दुसऱ्या शब्दांत अप्रत्यक्ष ज्ञान किंवा अनुमानिक युक्तिवादाद्वारे. मानवी ज्ञानात या बदलाने तार्किकतेचा सिद्धांत बदलला आहे. आता विज्ञानात हे सुस्थापित झाले आहे की आनुमानिक युक्तिवाद प्रत्यक्ष युक्तिवादाएवढेच वैध आहे.

आईनस्टाईनपूर्व युगात ईश्वराला न मानणारे लोक ईश्वराची संकल्पना अदृश्यजगाशी संबंधित आहे असे समजायचे. कारण ईश्वराच्या पुराव्यासाठी कोणताच प्रत्यक्ष युक्तिवाद उपलब्ध नव्हता. ईश्वरावरची श्रद्धा तर्कशून्य मानली जायची. आणि सर्व संबंधित अप्रत्यक्ष युक्तिवाद वैज्ञानिकदृष्टया अवैध मानले जायचे, कारण हे आनुमानिक स्वरूपात असायचे. पण आता संपूर्ण परिस्थिती बदलली आहे. अतिसूक्ष्म विश्वात किंवा विद्युत- चुंबकीय लहरींच्या विश्वात काहीच प्रत्यक्ष निरीक्षण करण्याजोगे नाही, म्हणूनच कुठल्याही गोष्टीचे

अस्तित्व प्रत्यक्ष युक्तिवादाशिवाय आनुमानिक युक्तिवादाद्वारे स्थापित केले जाऊ शकते. जर आनुमानिक युक्तिवाद अदृश्य अतिसूक्ष्म विश्वाच्या बाबतीत वैध आहे. तर हेच आनुमानिक युक्तिवाद ईश्वराच्या अस्तित्वासंबंधाने सुद्धा वैध आहे, बर्ट्रान्ड रसेल जरी तो नास्तिक होता, आपल्या पुस्तकात 'मी ख्रिश्चन का नाही?' (Why I am not a Christian?) या वास्तवाला कबूल करतो. तो म्हणतो की, ईश्वरवाद्यांनी म्हणजे ईश्वर आस्तिकांनी ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी रचनेला केंद्रीभूत ठेवून मांडलेला युक्तिवाद वैज्ञानिक युक्तिवाद आहे. म्हणजे या विश्वात रचना आहे म्हणून त्याचा एक रचनाकार आहे हे सिद्ध होते. प्राचीन काळापासून ईश्वरवाद्यांनी हाच युक्तिवाद केला होता की रचना आहे तर रचनाकार असणारच. जसे आपण पाहतो की हे विश्व पूर्णपणे सुरचित आहे. हे सुरचित विश्व त्याच्या रचनाकाराचे अस्तित्व मानण्यास आपल्याला भाग पाडते.

जेव्हा आपण आपल्या या विश्वाबद्दल सखोल विचार करतो तेव्हा आपल्याला आढळते की विश्वभर सर्वत्र नियोजन, रचना आणि बुद्धिमान नियंत्रण असणे या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण आहे कारण निर्मितीचा निर्माता आहे, रचनांचा रचनाकार आहे, सर्व हालचालींना हालचाल देणारा आहे.

दुसरा कोणताहि पुरावा याचे समर्थन करू शकत नाही. याठिकाणी मी काही वैश्विक संदर्भ देत आहे.

## विश्वाची सुरुवात

आपण 'सुरुवात' सुरुवातीपासून पाहू. विज्ञान आपल्याला सांगतो, की २५ अब्ज वर्षाआधी अवकाशात भयानक स्फोट (Big Bang) झाला. या Big Bang नंतर आपले विश्व अस्तित्वात आले. वैज्ञानिकांना असा पुरावा आढळला आहे की, विश्वाच्या प्रारंभी Cosmic Ball नावाची महाकाय खगोलीय वस्तू होती. सध्या या विश्वामध्ये असलेले सर्व घटक या Cosmic Ball मध्ये अतिशय घट्ट स्वरूपात एकत्रित होते.

ज्ञात भौतिक नियमांनुसार या सर्व घटकांसाठी आंतर स्वरूपाचा प्रवास (Inner Journey) शक्य होता. अवकाशात त्यांच्या बाह्य प्रवासाची मुळीच शक्यता नव्हती. खगोलशास्त्राच्या अध्ययनानुसार पुढे या Cosmic Ball मध्ये अचानक स्फोट झाला. अतिशय घट्ट अवस्थेत असलेले सर्व घटक बाह्य दिशेने विखरू लागले आणि अशा प्रकारे हे विश्व अस्तित्वात आले. कोणत्या बाह्य शक्तीच्या हस्तक्षेपाने हे घडले की घट्ट अवस्थेत असलेले सर्व घटक बाह्य दिशेने विखरू लागले? म्हणजेच एक हस्तक्षेप करणारा होता तोच सर्वशक्तीमान, सृष्टीनिर्माता ईश्वर.

हा एक भयानक स्फोट होता, आणि आपण जाणतो की कोणताही स्फोट विनाशकारी असतो, त्यशिवाय तो पूर्वनियोजित असतो. रशियाच्या चर्नोबिलची घटना त्याचे उदाहरण आहे. हा एक अचानक घडलेला स्फोट होता. जो पूर्णपणे विनाशकारी ठरला. उलटपक्षी भुयार बांधण्यासाठी जे स्फोट घडविले जातात ते नेहमी पूर्वनियोजित असतात, परिणामतः ते उपयुक्त ठरतात.

Big Bang च्या स्फोटातून एक अतिशय विधायक आणि अर्थपूर्ण विश्व अस्तित्वात आले. ही चमत्कारिक घटना आपल्याला हे मानायला लावण्यासाठी पुरेशी आहे की Big Bang चा स्फोट निश्चितपणे

पूर्वनियोजित होता. आणि जेव्हा हे सिद्ध होते की तो पूर्वनियोजित होता तेव्हा हेही आपोआप सिद्ध होते की या पूर्वनियोजनाच्या मागे एक योजनाकार होता. खरोखर एक महान योजनाकार होता आणि तो महान योजनाकार म्हणजेच सकल विश्वाचा स्वामी, सृष्टी भाग्यविधता, सकल विश्वाचा जनक एकमेव ईश्वर होय.

## विस्तारित विश्वामध्ये ईश्वराचा पुरावा

अंतराळातील वैज्ञानिक अभ्यासाने हे सिद्ध केले की आपले विश्व एक सतत विस्तारणारे विश्व आहे. आपल्याला माहित आहे की मानवी जगात कोणत्याही विस्ताराला मर्यादा असतात. ही मर्यादा ओलांडली की भयंकर स्वरूपाचा उद्रेक होण्याची शक्यता असते. या संबंधात येथे मला एक साधे उदाहरण द्यायचे आहे. जेव्हा आपण बलूनमध्ये हवा भरतो तेव्हा आपण अनिश्चित काळासाठी त्यामध्ये हवा भरू शकत नाही. प्रत्येक बलूनमध्ये हवा भरण्याची मर्यादा असते आणि मर्यादेपर्यंत पोहोचल्यानंतर ते फुटते.

मानवी इतिहासात अनेक राजकीय साम्राज्ये झाली आहेत. जसे रोमन साम्राज्य, ऑटोमन साम्राज्य, मोगल साम्राज्य, मराठा साम्राज्य, ब्रिटिश साम्राज्य, इत्यादी. त्यांच्या राज्यकर्त्यांना त्यांचे सत्ताक्षेत्र कायमचे वाढवायचे होते. परंतु एका विशिष्ट मर्यादेपर्यंत पोहचल्यानंतर ते व्यवस्थापित होऊ शकले नाहीत आणि कालांतराने ते कोसळले.

औद्योगिक घराणे किंवा औद्योगिक कंपन्यांबाबतही असेच घडत असल्याचे चित्र आपल्याला दिसते. त्यांचे मालक नेहमीच आपला व्यवसाय पुढे वाढवू इच्छित असतात. परंतु या किंवा त्या औद्योगिक कंपनीला दिवाळखोरीचा सामना करावा लागतो. ही बातमी आपण दररोज ऐकत असतो. असे का घडते? हे अगदी सोप्या कारणास्तव आहे की काही काळानंतर त्या कंपन्या अनियंत्रित स्थितीत पोहोचतात

आणि त्या कोसळतात.

याच्या विपरित, विश्वाची व्यवस्था एक अपवादात्मक स्वरूपाचे भिन्न उदाहरण सादर करते. ब्रह्मांड निरंतर आश्यर्यकारक गतीने विस्तारत आहे, परंतु कोट्यवधी वर्षांच्या विस्तारानंतर अद्याप विश्वाची व्यवस्था सुरळित कार्यरत आहे. ही व्यवस्था कधीही अनियंत्रित होऊन कोसळली नाही. विश्वाचा हा अपूर्व आणि अद्भुत गुणधर्म म्हणजे या जगाच्या मागे सुपर मॅनेजर किंवा सुपर प्लॅनर आहे, याचा पुरेसा पुरावा आहे. अन्यथा हे ब्रह्मांड फार पूर्वी कोसळले असते. (अधिक माहितीसाठी John Clover Mansoma यांनी संकलित केलेले ग्रंथ Evidence of God in an Expanding Universe पाहा.)

## वैश्विक सुसंवाद

वैज्ञानिक अभ्यास असे दर्शवितो की विश्वामध्ये संपूर्ण सुसंवाद आहे. अवकाशात असंख्य तारे आणि ग्रह आहेत. बहुदा सर्व महासागरांच्या किनाऱ्यांवर वाळूच्या सर्व कणांपेक्षा अधिक आहेत. त्यांची आकाशात टक्कर होत नाही.

विश्वात अशा असंख्य घटना आहेत. उदाहरणार्थ, पाऊस हा महासागर आणि सूर्यादरम्यान अत्यंत जटिल कृतीचा परिणाम आहे. एका वैश्विक आणि सुसंगतपूर्ण प्रक्रियेमुळे पाऊस शक्य होतो.

माणूस आणि झाड यांच्यात झालेली देवाणघेवाणदेखील अशा सुसंवादाचे उत्तम उदाहरण आहे. मनुष्य परिसरातील ऑक्सिजन वायूचे ग्रहण करतो आणि हवेत कार्बन डायऑक्साइड वायूचे ग्रहण आणि ऑक्सिजन वायूचे उत्सर्जन करतात. ही देवाणघेवाण एक अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया आहे, जी माणूस आणि झाड यांच्या जीवनाची हमी देते. अशा नैसर्गिक घटना विश्वामागे मध्यवर्ती व्यवस्थापन असल्याचे निःसंशयपणे सिद्ध करतात. खरोखरच, एक सुपर व्यवस्थापक आहे

आणि हा सुपर व्यवस्थापक इतर कोणीही नसून सर्व शक्तिमान ईश्वर आहे.

## वैश्विक प्रमाणबद्धता

वैज्ञानिक अभ्यास हेदेखील दर्शवितो, की विश्वातील प्रत्येक गोष्ट योग्य प्रमाणात आहे. विश्व एक अद्वितीय उद्योग आहे. विश्वाची सर्व उत्पादने शून्य दोष मानांकावर तयार केली जातात. झाडाकडे पहा, त्याचे सध्याचे आकार अंतिम मॉडेलवर आहेत. झाडाचे इतर कोणतेही मॉडेल अकल्पनीय आहे. आपण एखाद्या पुरुष किंवा स्त्रीकडे पाहूया. दोघेही अंतिम मॉडेल आहेत. कोणताही कलाकार पुरुष किंवा स्त्रीसाठी आणखी चागंले मॉडेल तयार करू शकला नाही.

आपल्या जगात ईश्वर निर्मित असंख्य गोष्टी आहेत. परंतु निसर्गातील प्रत्येक गोष्ट इतकी परिपूर्णपणे तयार केली गेली आहे की प्रत्येक गोष्ट जणू अंतिम मॉडेलवर आहे. या उलट आपण मानवांने बनविलेल्या मोटार गाड्यांकडे नजर टाकल्यास, आपणास आढळेल की पहिली मोटार गाडी बनल्यापासून त्यात मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात आल्या आहेत. विकासाची ही प्रक्रिया अद्यापही सुरू आहे.

अभ्यास हेदेखील दर्शवितो की निसर्गातील प्रत्येक गोष्ट परिपूर्ण अवस्थेत आहे. उदाहरणार्थ, सूर्य आणि पृथ्वी यांच्यातील अंतर घ्या. सूर्य आणि पृथ्वी यांच्यादरम्यान ९३,०००,००० मैल अंतर आहे. सर्व पर्यायांशी याची तुलना करता, आपणास समजेल की हे अतंर मानवी अस्तित्वासाठी अतिशय योग्य आहे.

जर हे अंतर सध्याच्या अंतरापेक्षा दुप्पट केले असते, म्हणजे १८०,०००,००० मैल, तर पृथ्वी इतकी थंड झाली असती की सर्वकाही गोठले असते. परिणामी पृथ्वीवरील कोणतेही जीवन शक्य झाले नसते. जर हे अंतर सध्याच्या अंतरापेक्षा निम्मे केले असते,

म्हणजे ५०,०००,००० मैल, तर पृथ्वीच्या पृष्ठभागावरचे तापमान इतके वाढले असते की सर्वकाही जाळले गेले असते आणि पृथ्वीवरील जीवन संपुष्टात आले असते.

आता आपण पृथ्वीचा आकार घेऊ. जर पृथ्वीचा आकार सध्याच्या आकारापेक्षा दुप्पट केला, तर गुरुत्वाकर्षण इतके वाढेल की त्याचा मनुष्याच्या वाढीवर विपरित परिणाम होईल. प्रत्येक पुरुष आणि स्त्रीचे बटूसारखे आकार होतील.

जर पृथ्वीचा आकार सध्याच्या आकारापेक्षा अर्धा केला, तर गुरुत्वाकर्षण धोकादायक पातळीपर्यंत कमी झाला असता. परिणाम स्वरूप प्रत्येक पुरुष आणि स्त्रीची अनियंत्रित शारीरिक वाढ झाली असती. प्रत्येकजण कुतुब मिनार इतका उंच होईल.

जग किती भयंकर असेल!

परंतु आरंभापासूनच या जगात सर्वकाही परिपूर्ण अवस्थेत आहे. यात कोणत्याही सुधारणेची आवश्यकता नाही. येथे सर्वकाही एका परिपूर्ण आणि अंतिम मॉडेलवर निर्माण करण्यात आले आहे. संपूर्ण विश्वात विद्यमान आश्चर्यकारक परिपूर्ण सृष्टी मागे एक परिपूर्ण निर्माता असल्याचा स्पष्ट पुरावा आहे. अन्यथा, या जगात अशा प्रकारची अर्थपूर्ण परिपूर्णता आणि सुव्यवस्था कधीही शक्य झाली नसती.

## नियंत्रण आणि संतुलन

वैज्ञानिक अभ्यासानुसार असे दिसून येते की निसर्गात सर्वत्र नियंत्रण आणि संतुलन प्रणाली कार्यरत आहे. ही प्रणाली नसती तर आपले जग निर्जन झाले असते.

याचे एक उदाहरण कीटकांच्या जगात आढळते. जैविक अभ्यास आम्हाला सांगतो की प्रत्येक कीटकात अमर्यादित वाढ होण्याची क्षमता असते. उदाहरणार्थ, प्रत्येक नाकतोडा हा उंट किंवा हत्ती इतका मोठा होऊ शकतो. इतर कीटकांच्या बाबतीत हेच आहे. मात्र जर असे घडले असते तर मानवाने अशा महाकाय प्राण्यांच्या जंगलात वस्ती करून राहण्याची आणि संस्कृती निर्माण करण्याची कोणतीही शक्यता नव्हती.

मानवजातीला या भयानक घटनेपासून कसे वाचविण्यात आले? हे निसर्गाच्या एका साध्या यंत्रणेमुळे होत असते. खरे म्हणजे कीटकांच्या शरीरात अमर्यादित वाढीची क्षमता असूनही, त्याच्या श्वास नलिकेत वाढीस वाव नसतो. कीटकांच्या शरीरातील ही दुहेरी प्रणाली त्यांच्या अमर्यादित वाढीस प्रतिबंध म्हणून कार्य करते. कीटकांचे वाढते शरीर त्यांच्या श्वासनलिका अरुंद करते आणि शरीरात ही दुहेरी यंत्रणा कीटकांसाठी मारेकरी म्हणून कार्य करते. अशा नियंत्रणाची इतर बरीच उदाहरणे आहेत आणि हेच नियंत्रण आपल्या जगात संतुलन राखते. जर तसे नसते तर आपली पृथ्वी मानवजातीसाठी वास्तव्य करण्यास योग्य राहीली नसती.

पृथ्वी ग्रह आपल्या विलक्षण गुणधर्मांमुळे ब्रह्मांडात एक अद्भुत अपवाद आहे. पृथ्वीचा अपवाद वगळता, ज्यामध्ये जीवन आणि त्याच्यासोबत आधारलेले घटक आहेत, ब्रह्मांडातील असंख्य संस्था एकतर प्रचंड तारे किंवा खडकाळ ग्रह आहेत. पृथ्वीचा हा अपवाद ईश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा आहे.

प्रत्येक अपवादासाठी अपरिहार्यपणे या प्रश्नाचे उत्तर आवश्यक आहे: कोण या अपवादाचे कारण आहे? कारण आणि परिणाम यावर विश्वास ठेवल्याशिवाय अपवाद का आहे हे आपण समजू शकत नाही. पृथ्वीच्या बाबतीत हा विलक्षण अपवाद म्हणजे ईश्वर अस्तित्वात आहे याचा पुरावा आहे.

## पृथ्वी या ग्रहाचे वेगळेपण

संपूर्ण ब्रम्हांडात 'पृथ्वी' हा ग्रह त्याच्या विशिष्ट गुणांमुळे एक अद्वितीय अपवाद आहे. पृथ्वीचा अपवाद वगळल्यास ब्रम्हांडातील सर्व ग्रह एक तर अग्नीचे तारे आहेत किंवा खडकाळ ग्रह आहेत. केवळ पृथ्वीवर जीवन आहे, आणि इथे जीवनासाठी आवश्यक घटक आहेत. ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. अपवाद आहे म्हणजे हस्तक्षेप आहे. आणि हस्तक्षेप आहे म्हणजे हस्तक्षेप करणारा आहे आणि एकदा हस्तक्षेप करणाऱ्याचे अस्तित्व सिद्ध झाले की ईश्वराचे अस्तित्व आपोआपच सिद्ध होते.

इथे मी हे सांगू इच्छितो की अशा परिस्थितीत आपल्यासमोर 'ईश्वर निर्मित विश्व' किंवा 'ईश्वराशिवाय विश्व' हा विकल्प नसून 'ईश्वर निर्मित विश्व' या ऐवजी 'मुळात विश्वच अस्तित्वात नाही' हा विकल्प होऊ शकत नाही. कारण विश्वाचे अस्तित्व आपल्यासमोर उघड वास्तव आहे, जे आपण नाकारू शकत नाही. आणि म्हणून 'ईश्वर निर्मित विश्व' या विकाल्पाला स्वीकारल्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

## प्रकरण ३
# मनुष्य ईश्वराशिवाय राहू शकत नाही
(Man does not stand alone)

सुप्रसिद्ध ब्रिटिश लेखक ज्युलियन हक्सले (१८८७-१९७५) यांचा ईश्वरावर विश्वास नव्हता. त्यांचा असा विश्वास होता की मनुष्याला ईश्वराची गरज नाही, अशी संकल्पना त्यांनी Man stands alone या पुस्तकात स्पष्ट केली आहे. हे उल्लेखनीय आहे की नामांकित अमेरिकन शास्त्रज्ञ अब्राहम क्रेसी मॉरिसन (१८६४-१९५१) यांनी ज्युलियनच्या प्रबंधाचा प्रतिकार Man does not stand alone या पुस्तकात केला होता.

(मॉरसन यांचे पुस्तक Seven Reasons Why Scientist Believes in God या संदर्भात वाचनीय आहे,)

आजही बरेच लोक असे विचार व्यक्त करताना दिसतात की त्यांना ईश्वराची गरज नाही आणि ते या जगात सर्वशक्तिमान ईश्वरावर विश्वास ठेवल्याशिवाय यशस्वी होऊ शकतात.

परंतु आपण सर्वेक्षण केल्यास आपल्या लक्षात येईल की त्यांचे विचार परिपक्क समज दर्शवीत नाहीन. खरे तर, अशी टीका बहुतेक वयाच्या चाळीस वयोगटाखालील अपरिपक्क मनाने केल्याचे दिसते. मानसशास्त्रीय आणि जीवशास्त्रीय अभ्यासानुसार असे दिसून येते की मध्यम वयानंतरच मनुष्य परिपक्कता प्राप्त करतो. या अगोदर ते जीवनाच्या वास्तविकतेविषयी कोणतेही स्पष्ट मत तयार करण्याच्या स्थितीत नसतात. सर्वेक्षणामधून हे दिसून येते की ईश्वराबद्दल वरवरच्या टीका मुख्यतः वैचारिकदृष्ट्या अपरिपक्क असलेल्या लोकांकडून केल्या जातात. परंतु अपरिपक्कतेपासून परिपक्कतेकडे होताना या बदलात, जेव्हा अनुभव ज्ञान संपादनासह येते नास्तिक आणि धर्मत्यागासहित बरेच लोक ईश्वराकडे पाहण्याच्या दृष्टीने गंभीर बनतात.

एका विचारवंताने योग्यपणे म्हटले आहे:

अल्पज्ञान लोकांना ईश्वरापासून विचलित करते, परंतु सखोल ज्ञान त्यांना ईश्वराजवळ आणते. हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी येथे काही उदाहरणे दिली आहेत.

चला त्या तरुणाच्याबाबतीत विचार करूया, जो रोमँटिक विचारांनी मोठा झाल्यावर, ''लव्ह मॅरिज'' ची निवड करून विवाहित जीवनात उत्साहाने प्रवेश करतो. पण लवकरच हे प्रेम द्वेषाकडे वळते आणि शेवटी हे जोडपे विभक्त होते. त्यानंतर लवकरच प्रियसी आणि प्रियकर दोघांना समजने की प्रेमाला सर्वात मोठे पुण्य समजणे हा त्यांच्या स्वत:च्या अपरिपक्वतेचा भाग होता. जाणीवपूर्वक किंवा अजाणीवपूर्वक, त्यांना असे वाटू लागते की जीवनाचे वास्तव समजून घेण्यासाठी त्यांची धारणा तितकी स्पष्ट झालेली नाही. त्यांच्या अज्ञानाची भरपाई करण्यासाठी त्यांना एका उत्कृष्ट मार्गदर्शकाची गरज होती.

मग व्यवसाय सुरू करणाऱ्या महत्त्वाकांक्षी उद्योजकाचे उदाहरण घ्या. तो आपला व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढवत राहतो. पण काही काळानंतर त्याचे बरेच नुकसान झाले आणि त्याचा व्यवसाय बंद पडण्याच्या मार्गावर आला. आता त्याला समजले की काही विशिष्ट मर्यादा त्याच्या इच्छा आणि महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याच्या मार्गावर अडथळे निर्माण करतात. त्याला असे वाटते की आपल्या स्वप्नांना साकार करण्यासाठी त्याला एका परिपूर्ण जगाची आवश्यकता आहे.

त्याचप्रमाणे अजून एका युवकाचे उदाहरण घ्या, जो आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी राजकीय पक्ष स्थापन करतो. बऱ्याच काळानंतर शेवटी तो स्वत:साठी महत्त्वाचे राजकीय पद मिळवण्यात यशस्वी होतो. परंतु त्यानंतर तो त्याच मानसिक स्थितीत पोहोचला, जसे पंडित जवाहरलाल नेहरू यांना पंतप्रधान झाल्या नंतर सामोरे जावे

लागले होते. त्यांनाही दुसऱ्या विचारांनी ग्रासले होते. त्याना वाटत होते की त्यांच्यापेक्षा कितीतरी मोठी शक्ती अस्तित्वात आहे, ज्या शक्तीच्या सहकार्याशिवाय ते आपल्या योजना प्रत्यक्षात आणू शकत नाहीत.

तरुण पिढी अनेक महत्त्वाकांक्षा घेऊन जीवनाच्या स्पधेत प्रवेश करते. परंतु पुनःपुन्हा त्यांना असे अनुभव येतात, जे त्यांना त्यांच्या असहायतेची आठवण करून देतात. आजार, अपघात, आर्थिक नुकसान, इत्यादी– हे सर्व त्यांना वारंवार आठवण करून देतात की त्यांचे आयुष्यातील प्रयत्न अपूर्ण इच्छांचे प्रतिबिंब आहे. मग ते पाहतात की, जरी एखाद्या व्यक्तीला भौतिक यश मिळाले, तरीही १०० वर्षांपेक्षा कमी कालावधीत त्याचा अपरिहार्यपणे मृत्यु होतो. अशा कडू अनुभवातून असे दिसून येते की बालपणाची आणि तरुणपणाची सर्व गोड स्वप्ने अज्ञानामुळे प्रेरित झालेली असतात. कारण, सध्याच्या अपरिपूर्ण जगात परिपूर्ण आनंद उपभोगणे अशक्य आहे.

आयुष्यातील एखाद्या व्यक्तीचे लक्ष्य, मग ते पैसा कमविणे असो, प्रसिद्धी किंवा सत्ता संपादन किंवा या स्वरूपाचे काहीही, ते सर्व आदर्शापेक्षा अतिशय कमी सिद्ध होतात. मोठ्या संघर्षानंतर माणूस यशस्वी होतो, परंतु त्याला वाटते की त्याने जे काही साध्य केले ते त्याच्या अपेक्षेपेक्षा फारच कमी आहे. म्हणून तो कायमचा असमाधानी राहतो. यश मिळवणे हे न मिळण्याइतके निरर्थक होऊन जाते.

# प्रकरण ४
# ईश्वर : विश्वासाचा स्त्रोत आहे

जर तुमच्याकडे एक सुपर टेलिस्कोप असेल ज्याने संपूर्ण ब्रह्मांड पाहता येते, तर सर्वप्रथम तुम्हाला पृथ्वी नावाचा दुर्मिळ ग्रह दिसेल. तुम्ही असे निरीक्षण कराल की, संपूर्ण निर्जीव विश्वामध्ये, या छोट्या ग्रहावर विपुल जीवन आणि सर्व प्रकारचे जीवनावश्यक घटक आहेत. हे दुर्मीळ, अपवादात्मक दृश्य इतके अतुलनीय आहे की आपण आश्चर्यचकित व्हाल.

आपण हेदेखील पहाल की, पृथ्वी, चंद्र आणि इतर ग्रह निरंतर गतिमान आहेत. म्हणजेच ते आपल्या अक्षावर आणि सूर्याभोवती फिरतात. मग ही संपूर्ण सौर यंत्रणा आकाशगंगेच्या विस्तीर्ण वर्तुळात गतिमान आहे आणि ही आकाशगंगा अन्य आकाशगंगेच्या विस्तीर्ण वर्तुळात फिरते.

या विशाल अनंत अंतराळामध्ये तारे आणि ग्रह यांची निरंतर हालचाल आपल्या दृष्टीने आश्चर्यचकित करणारी आहे. त्यानंतर आपल्याला असंख्य अग्नीचे चेंडू दिसतील, ज्याला तारे म्हणतात, जे प्रचंड वेगाने फिरतात. या सर्व अवकाशीय शरीरांमध्ये आपली पृथ्वी वाळूच्या कणापेक्षा फार मोठी नव्हे. हे दृश्य आपल्यासाठी इतके विलक्षण असेल की, आपले स्वतःचे अस्तित्व पूर्णपणे क्षुल्लक आणि निरुपयोगी वाटेल. हा अनुभव आपल्याला एकाच वेळी दोन गोष्टींच्या शोधाकडे नेईल. सर्वप्रथम, या विश्वाचा एक सर्वशक्तिशाली ईश्वर आहे, जो त्याचा निर्माता तसेच निर्वाह करणारा आहे. जर या विश्वाचे दृष्य आपल्या मनावर उमटले तर आपले हृदय स्वाभाविकपणे साक्ष देईल की हे विश्व स्वतः त्याच्या निर्मात्याचा स्पष्ट पुरावा आहे. दुसरे म्हणजे, आपणास असे वाटते की आपण या विश्वातील एक असहाय

आणि क्षुल्लक प्राणी आहोत आणि ईश्वराशिवाय आपले अस्तित्व शक्य नाही. हे जीवनातील सर्वात महत्वाचे वास्तव आहे. माणसाला हे वास्तव जेव्हा समजेल, तेव्हा तो स्वेच्छेने ईश्वराकडे वळेल. तो शुद्ध अंतःकरणातून म्हणेल: ''हे ईश्वरा, मला मदत कर! कारण तुझ्या मदतीशिवाय सर्वकाही चुकीचे होईल.''

या विशाल विश्वात, मनुष्याचा एकमात्र आधार स्त्रोत ईश्वर आहे. ईश्वराच्या मार्गदर्शनानेच मनुष्याचे जहाज शाश्वत यशाच्या किनाऱ्यावर सुरक्षितपणे आणले जाते. ईश्वरावर विश्वास मानवासाठी सर्वात महत्वाची गोष्ट आहे. मनुष्य या विश्वासाशिवाय काहीही नाही.

कधीकधी, दैनिंदिन जीवनात, मनुष्याच्या मनात असहायतेची भावना निर्माण होते, जशी दुर्बिणीद्वारे विश्वाच्या निरीक्षणानंतर त्याला अनुभवते.

जेव्हा एखाद्या पुरूषाला किंवा स्त्रीला जे पाहिजे ते साध्य होत नाही, तेव्हा त्यांना अनेक मर्यादा आहेत याची जाणीव होत असते. या मर्यादा त्यांना आपल्या असहायतेची जाणीव करून देतात. आपल्यापैकी प्रत्येकाने आर्थिक नुकसान, आजार, अपघात, किंवा म्हातारपण अनुभवले आहे. हे अनुभव वारंवार आपल्याला याची आठवण करून देतात, की आम्हाला एका वरिष्ठ सामर्थ्याची गरज आहे. अशा सर्वश्रेष्ठ सामर्थ्याच्या मदतीशिवाय आपण जीवन जगू शकत नाही. या भावना ईश्वराच्या अस्तित्वाच्या मानसशास्त्रीय पुराव्यासारखे असतात. आपल्या जीवनात आपण कधीतरी अशा मानसिक अनुभवातून जातो. आपल्यातील प्रत्येकजण, त्याच्या भावनांमध्ये, ईश्वराच्याच अस्तित्वाचा साक्षीदार आहे.

प्रत्येक मनुष्याचा स्वभाव सतत त्याला किंवा तिला देवाची गरज ओळखण्यासाठी उद्युक्त करतो. ईश्वराशिवाय आपले जीवन पूर्ण होऊ शकत नाही. ईश्वराच्या मदतीशिवाय आपण जीवनात यशस्वी

होऊ शकत नाही.

मानवाची स्थिती पुढील उदाहरणाद्वारे स्पष्ट केली जाते.

शंभर वर्षापूर्वी एका जहाजाचा अमेरिकेच्या किनाऱ्यापासून आफ्रिकेपर्यंत प्रवास झाला होता. जहाज समुद्रात फार लांब असताना जोरदार वादळ उठले. जहाज थरथर कापू लागले. सर्व प्रवासी भयग्रस्त आणि चिंताग्रस्त अवस्थेत होते. या संकटाच्या वेळी, एका प्रवाशाने एका लहान मुलीला डेकच्या एका कोपऱ्यात बसलेले पाहिले. वादळामुळे अबाधित तिच्या बाहुल्यांबरोबर खेळत होती. हे पाहून तो उत्सुक झाला आणि तिला विचारले, ''आमच्या जहाजात काय चालले आहे ते तुला ठाऊक आहे काय?'' तिने विचारले, ''काय झाले आहे?'' जहाज धोकादायक वादळात अडकल्याचे प्रवाशानी तिला सांगितले. मुलीने शांतपणे उत्तर दिले: ''तुम्हाला माहिती आहे का, की माझे वडील या जहाजाचा कॅप्टन आहे. तो बुडणार नाही.''

मुलीच्या तिच्या वडिलावरील विश्वासाने तिला या महत्त्वपूर्ण क्षणी भीतीचा बळी होण्यापासून वाचवले. धार्मिक व्यक्तिबद्दलही असेच आहे. त्याचा सृष्टिकर्ता, सर्वशक्तिमान ईश्वरावर एखाद्या मुलासारखा विश्वास असतो. पण त्याचा विश्वास जास्त तीव्रतेचा आहे. जेव्हा आपत्तीचा धोका उद्भवतो, तेव्हा तो अधिक दृढ निश्चयाने म्हणू शकतो की ईश्वर सर्वशक्तिमान त्याच्या जीवनाच्या जहाजाचा कॅप्टन आहे. तो कधीही, कोणत्याही परिस्थितीत त्याला बुडू देणार नाही.

थोडक्यात, अध्यात्म मनाला जागृत करते. अध्यात्म हे नेहमीच एक महान शक्ती असते. अध्यात्म हे चारित्र्य निर्मितीचे सर्वोत्तम सूत्र आहे. अध्यात्म सर्व चांगल्या गोष्टींचा प्रवर्तक आहे आणि वाईट गोष्टींचा मारक आहे. अध्यात्म हे सर्व धर्मांचे सार आहे. चला आपण सर्व हा सार्वत्रिक धर्म स्वीकारूया.

# प्रकरण ५

# ईश्वराला समर्पित जीवन

पृथ्वी हा सूर्यमालेतील एक ग्रह आहे. ती सूर्याभोवती सतत फिरत असते. त्यास परिक्रमाचे एक चक्र पूर्ण करण्यास एक वर्ष लागते. पृथ्वीवरील मानवी जीवनासाठी हे तिचे भ्रमण आवश्यक आहे. जर पृथ्वी सूर्याभोवती फिरली नसती तर पृथ्वीचे अस्तित्व संकटात सापडले असते आणि पृथ्वीवरील जीवन संपुष्टात आले असते.

आपण या जगात आपले जीवन कसे जगावे याचे हे व्यावहारिक उदाहरण आहे. ज्याप्रकारे पृथ्वी सूर्याभोवती फिरत असते त्याच प्रकारे आपले जीवन ईश्वराभोवती फिरले पाहिजे. म्हणजेच, सर्व मानवी कृत्ये ईश्वर केंद्रित असणे आवश्यक आहे.

पृथ्वीचे भ्रमण नैसर्गिक नियमांच्याअधीन आहे. परंतु मनुष्याने आपले जीवन स्वेच्छेने ईश्वराला समर्पित केले पाहिजे. निर्मात्याच्या संकल्पनेतून त्याने आपले जीवन उभारले पाहिजे. ही जाणीव मानवाला यशाच्या शिखरावर आणते. सर्वांगीण यशाचे रहस्य या देहभानात आहे.

ईश्वराला समर्पित जीवन त्याच्या शोधापासून सुरू होते. एखादी स्त्री किंवा पुरुष जेव्हा देवाचा शोध घेते तेव्हा याचा अर्थ असा होतो की त्याला सत्य सापडले आहे. हे सत्य त्याच्या संपूर्ण अस्तित्वाला प्रभावित करते. सत्य शोधण्याची ही भावना एक रोमांचित करणारा अनुभव आहे जो माणसाला प्रचंड विश्वासाने भारतो. हा शाश्वत विश्वास त्याच्या जीवनास सर्व प्रकारच्या त्रासांपासून मुक्त करतो. म्हणूनच, कोणत्याही प्रकारच्या नुकसानीचे आता त्याला मूल्य नसते, कारण त्याची सर्वोत्तम संपत्ती म्हणजेच त्याचा ईश्वर त्याच्याबरोबर आहे ही भावना तो कधीही गमावत नाही.

ईश्वराच्या निर्मितींवर सखोल विचार केल्यास एखाद्या यक्तीला त्याचे आकलन होते. वास्तविकता अशी आहे की संपूर्ण विश्व ही ईश्वराच्या कृपेची अभिव्यक्ती आहे. संपूर्ण विश्व या दृष्टिकोनातून देवाची ओळख आहे. विश्वाच्या निर्मितीत ईश्वराचे दर्शन घडते. आरशामध्ये माणूस आपले स्वतःचे प्रतिबिंब स्पष्टपणे पाहातो त्याप्रमाणेच निर्मात्याचे हे दर्शन आहे. ब्रह्मांडाची विशालता दाखवते की त्याचा निर्माता किती असीम आहे, विराट आहे. सूर्य आणि ताऱ्यांचे काळजीपूर्वक निरीक्षण केल्याने असे दिसून येते की ईश्वर प्रकाशस्वरूप आहे. पर्वतांची उंचता ईश्वराची महानता दर्शवते. पर्वतांची शिखरे ईश्वराची थोरवी सांगतात. समुद्राच्या लाटा आणि नद्यांचा वाहणारा प्रवाह हे दर्शवितो की ईश्वर असीम कृपेचा भांडार आहे. आपल्याला झाडाच्या हिरवळीत ईश्वराचे औदार्य दिसते. माणसाला हळू हवेत दैवी स्पर्श जाणवते. पक्ष्यांच्या किलबिलाटात त्याला ईश्वराची स्तुती ऐकू येते.

**ईश्वराची आठवण** : माणसासाठी ईश्वर–समर्पित जीवन त्याच्या आठवणीने सुरू होत असते. स्मरण करून तो ईश्वराचे अस्तित्व अनुभवतो. प्रत्येक गोष्ट त्याला ईश्वराची आठवण करून देते, ईश्वराची आठवण त्याच्या मनातून कधीच मिटत नाही. तो आपली सकाळ आणि संध्याकाळ अशाप्रकारे व्यतीत करतो, जणू तो ईश्‍वराच्या शेजारी राहत आहे. जसा पाऊस पाण्याने पृथ्वीला तृप्त करतो त्याच प्रकारे ईश्वराच्या स्मरणात मग्न होऊन माणूस समाधानी होतो.

**ईश्वर : आध्यात्मिक प्रबोधनाचा स्रोत** : केवळ ईश्वरच मानवी भक्तीचे केंद्र आहे. ज्या माणसाचे मन ईश्वराशी जोडलेले आहे, तो प्रत्येक क्षणी अध्यात्मिक अनुभवातून जातो. त्याच्यासाठी ईश्वरावर विश्वास ठेवणे हे आध्यात्मिक विकासाचे साधन बनते. जेव्हा तो ईश्वराच्या प्रेमाने भरलेला असतो, त्यानंतर त्याला इतर कशाचीही गरज नसते. त्याच्यासाठी, ईश्वरा एक विशाल महासागर बनतो,

ज्यामध्ये तो सतत कोणत्याही मर्यादेशिवाय तरंगतो. आध्यात्मिक प्रबोधनाच्या स्वरूपात, त्याला इतकी मोठी संपत्ती प्राप्त होते की त्याला दुसऱ्या कशाचीही गरज भासत नाही. ज्याला निर्मात्याचा शोध लागला त्याच्यासाठी संपूर्ण विश्व खुल्या पुस्ताकासारखे बनते. झाडाची पाने त्याच्यासाठी दैवी पुस्तकाची पाने बनतात. जेव्हाजेव्हा तो सूर्य पाहतो तेव्हा त्याला वाटते की निर्माता दिव्य प्रकाश टाकत आहे. जेणेकरून माणसाला आपले पुस्तक स्पष्टपणे वाचता यावे. हे विश्व त्या माणसासाठी जणू दैवी विद्यापीठासारखे आहे आणि तो त्याचा विद्यार्थी आहे. ईश्वर शोधणे म्हणजे आपले प्रेमकेंद्र शोधणे. मनुष्य नैसर्गिकरित्या अशा सवोच्च अस्तित्वाच्या शोधत असतो, जो सर्व मर्यादांपासून मुक्त असावा, जो मानवी भावनांचे केंद्र असावे. निर्मात्याचा शोध लागल्यानंतर वयस्कर गृहस्थास तसेच समाधान वाटते, जसे एका बाळाला आपल्या आईच्या कुशीत असताना वाटत असते. ईश्वराची प्राप्ती माणसाला ईश्वर सोडून इतर कोणालाही उपास्य बनवण्यापासून रोखते. ईश्वर शोधणे ही त्याचा निर्माता आणि पालनकर्ता शोधण्याची स्वाभाविक इच्छा आहे. निर्मात्याचा शोध घेण्यात अपयश म्हणजे सर्वाधिक मोठी गरज भागवण्यात माणसास आलेले अपयश.

जो माणूस ईश्वर शोधण्यात अपयशी ठरतो, तो आपल्या स्वाभाविक इच्छेला विकृत स्वरूपात प्रतिसाद देत, ईश्वराच्या ठिकाणी एखाद्या व्यक्तीला, कधी प्राण्याला, कधी मूर्त्यांना तर कधी प्राकृतिक किंवा भौतिक गोष्टींना, तर कधी काल्पनिक विचारांना, किंवा कधी स्वत:च्या इच्छेला स्थापित करतो. ईश्वराला आपला उपासक बनवून माणूस आपली प्रतिष्ठा वाढवतो. उलट, ईश्वराशिवाय दुसऱ्याची उपासना करणे म्हणजे स्वतःला मानवतेच्या पातळीखाली ढकलण्यासारखे आहे.

म्हणूनच, मानवासाठी आणि संपूर्ण विश्वासाठी ईश्वरास समर्पित होणे हा एकच मार्ग आहे.

# प्रकरण ६
# उत्तरदायित्वाची संकल्पना

ईश्वर माणसासाठी अपरिहार्य आहे, ईश्वराशिवाय त्याचे आयुष्य अपूर्ण आहे. एका तत्वज्ञानीने असे म्हटले आहे की जर ईश्वर नसते तर आपल्याला एखाद्या ईश्वराची कल्पना करावी लागली असती. ईश्वर खरोखर अस्तित्त्वात आहे हे आपले सौभाग्य आहे. आपण तर्कसंगतपणे ईश्वरावर विश्वास ठेवू शकतो. आम्हाला कल्पित ईश्वराची गरज नाही, परंतु ईश्वर खरोखरच अस्तित्त्वात आहे, आणि आपल्या जीवनात तो ज्या उच्च स्थानाचा मानकरी आहे ते आपण त्याला देऊ शकतो.

मनुष्याला जगण्याची उत्कृष्ट कल्पना आणि व्यवस्था असणे अनिवार्य आहे. ईश्वर त्याला एक अशी प्रणाली देतो जे जीवन जगण्याचे एक संपूर्ण तत्त्व आहे.

मनुष्य यांत्रिकी प्रणालीद्वारे नियंत्रित केलेल्या मशीनसारखे नाही, किंवा तो त्याच्यां नैसर्गिक प्रवृत्तीद्वारे नियंत्रित केलेल्या प्राण्यांसारखा नाही. माणूस एक स्वतंत्र अस्तित्व आहे, तो आपल्या स्वेच्छेने जगतो. आता माणूस सत्याच्या वाटेवर कसा ठेवायचा हा प्रश्न आहे. यासंदर्भात, इतिहास साक्ष देतो की जे काही सांसारिक उपाय घेतले गेले ते निष्फळ ठरले आहेत, ते उपाय सामाजिक दबावामुळे झाले आहेत किंवा ते कायदेशीर आहेत किंवा ते समाजसुधारकांच्या उपदेशाच्या आणि विनंतीच्या रूपात आहेत. अनुभवावरून असे दिसून येते की समाजिक दबाव मर्यादित आहे परंतु तो पूर्णपणे कुचकामी नाही. कायद्याच्या तावडीतून सुटण्याचे बरेच मार्ग आहेत ज्यामुळे गुन्हेगारांना पळून जाणे अवघड नाही. समाज सुधारण्यासाठी समाज सुधारकांचे प्रयत्न केवळ उपदेशाच्या रूपात आहेत आणि केवळ उपदेश करणे मानवी जीवनात क्रांती आणू शकत नाही.

सत्य हे आहे की शिस्तबद्द आचरण गाठण्यासाठी मनुष्याने स्वतःहून एक उच्च आणि मजबूत अस्तित्व स्वीकारले पाहिजे, ज्याला प्रत्येक क्षणी माणसाच्या सर्व कृतीची माहिती असते. जो माणसाला बक्षीस आणि शिक्षा देऊ शकतो, ज्याच्या शिक्षेतून सुटका करून घेणे अशक्य आहे.

या गुणांचा वाहक केवळ एक अस्तित्व असू शकते आणि तो ईश्वर आहे! ईश्वरावर विश्वास एकाच वेळी दोन गोष्टींमध्ये कार्य करतो – एकीकडे, ईश्वराच्या रूपाने मनुष्याला असे आत्मिक केंद्र सापडते ज्यास त्याच्या संपूर्ण कार्याची जाणीव असते आणि ज्याला माणसाला वेठीस धरण्याचे किंवा शिक्षा देण्याचे अपार सामर्थ्य आहे. माणसाला ईश्वराच्या शिक्षेतून सुटणे शक्य नाही. ईश्वरावर विश्वास ठेवल्यामुळे मनुष्याला वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनातही सर्व परिस्थितींमध्ये योग्य आणि नैतिक आचरण अवलंबण्यास भाग पाडले जाते. अशा परिस्थितीत, एखादी व्यक्ती ईश्वराच्या शिक्षेपासून स्वत:ला वाचवू शकते, त्याशिवाय, ईश्वराच्या शिक्षेपासून सुटण्याचे आणखी कोणताही मार्ग नाही.

आणखी एक मुद्दा असा आहे की ईश्वरावर विश्वास ठेवणे हे अमर्याद आशेचे स्त्रोत आहे. सत्याच्या मार्गावर चालत आपले नुकसान झाले असेल किंवा इतर कोणत्याही आपत्तीला बळी पडलो, तर ते सहन करण्यासाठी तो सक्षम असतो, या विचाराने माणूस जगात आपले जीवन व्यतीत करू शकतो. कारण जर तो सत्याच्या मार्गावर स्थिर राहिला तर ईश्वर त्याला अनंतकाळाचे नंदनवन म्हणून प्रतिफळ देईल आणि यापेक्षा मोठे बक्षीस आणखी काहीही असू शकत नाही.

मानवाला स्वत:ला नैतिक मूल्यांमध्ये बाधंणे शक्य नाही. हे त्याच वेळी शक्य आहे, जेव्हा तो असा विश्वास ठेवतो की तो सर्वशक्तिमान, सर्वसामर्थ्यवान आणि अत्यंत न्यायाधीश ईश्वराच्या

नजरेत आहे. केवळ तोच मनुष्याला सत्यमार्ग दाखवू शकतो आणि त्या सत्यमार्गापासून विचलित झालेल्या कोणत्याही माणसाला शिक्षा देऊ शकतो.

आपले हे वर्तमान जग गुन्हेगाराला शिक्षा करण्यासाठी पुरेसे नाही. त्याचप्रमाणे सत्कर्मांना मोठे पुरस्कार देण्यासाठी हे जगदेखील पुरेसे नाही. ईश्वराची धारणा आपल्याला सांगते की सध्याच्या जगाच्या सर्व मर्यादांपेक्षा स्वतंत्र असे जग निर्माण करण्यास ईश्वर सक्षम आहे जेथे शिक्षा व बक्षिसे दोन्ही समाधानाने पुरविणे शक्य आहे.

सर्वशक्तिमान ईश्वराच्या संकल्पनेबरोबरच उत्तरदायित्वाची संकल्पनादेखील येते. ईश्वरासमोर उत्तरदायित्वाची संकल्पना ही योग्य विचारसरणी आणि चांगल्या कर्मांचा वैचारिक आधार आहे. उत्तरदायित्वाची कल्पना मनुष्याला ईश्वराच्या शिक्षेची आठवण करून देऊन सावध करते. त्याहीपेक्षा, ईश्वरासमोर उत्तरदायित्वाची कल्पना एखाद्या व्यक्तीला हा विश्वास ठेवण्यास प्रवृत्त करते की जर तो प्रत्येक परिस्थितीत सत्यमार्गावर ठाम राहिला तर ईश्वर त्याला प्रतिफळ देईल. याउलट, जर एखादा माणूस सत्याला नकार देतो, सत्यमार्गाचा त्याग करतो आणि चुकीचा मार्ग स्वीकारतो तर तो ईश्वराच्या कठोर शिक्षेस पात्र ठरतो.

ईश्वराची धारणा मनुष्यास एक अशी विचारधारा प्रदान करते की ज्यामध्ये तोटा फायद्यात परिवर्तित होतो आणि आपत्ती ही चांगली बातमी बनते.


# THE QURAN

Available in different languages. Easy to understand




Buy Online / Order Free Quran / Download / Be a Quran Distributor


www.goodwordbooks.com / www.j.mp/freequran4all



Born in 1925, in Azamgarh, Uttar Pradesh, is an Islamic spiritual scholar who is well-versed in both classical islamic learning and modern disciplines. The mission of his life has been the establishment of worldwide peace. He has received the Padma Bhushan, the Demiurgus Peace International Award and Sayyidina Imam-Al-Hassan Peace Award for promoting peace in Muslim societies. He has been called 'Islam's spiritual ambassador to the world and is recognized as one of it's most influential Muslims. His books have been translated into sixteen languages and are part of university curricula in six countries. He is the founder of the Centre for peace and Spirituality based in New Delhi.


## SPIRIT OF ISLAM

App Now Available at




**Download the app :**
http://goo.gl/cCGpQJ

## SPIRIT OF ISLAM

*(Montly Magazine)*

Towards Global Peace and Spiritual Living
**SMS for a complimentary copy**
**08050202626**
**Email :** thecentreforpeace@gmail.com
**Web.:** www.cpsglobal.org



CPS International
centre for peace & spirituality
www.cpsglobal.org

Goodword
www.goodwordbooks.com

ISBN 978-93-86589-56-9
9 789386 589569